स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

सामाजिक विद्याशाखे अंतर्गत 'राज्यशास्त्र' या विषयात विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरिता सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा आराखडा

अभ्यास विषय

"मानवी हक्क आणि मराठवाडयातील मातंग समाजाची परिस्थिती: एक चिकित्सक अभ्यास"

संशोधक

पिराजी दत्ता गोणारकर

मार्गदर्शक

प्रा.डॉ.कविता गंगाधर सोनकांबळे

सहयोगी प्राध्यापक,राज्यशास्त्र विभाग,

यशवंत महाविद्यालय,नांदेड.

संशोधन केंद्र

यशवंत महाविद्यालय, नांदेड

2022

अनुक्रमणिका

अनु.क्रं.	शिर्षक
१	प्रस्तावना
२	समस्यासुत्रण
३	संकल्पना स्पष्टीकरण
४	संदर्भ साहित्याचा आढावा
५	उद्दिष्टे
६	गृहीतके
७	संशोधन पद्धती
७ I)	नमुना निवड
८)	संशोधन विषयाचे महत्व
९)	संशोधनाची व्याप्ती व मर्यादा
१०	प्रकरणाची रूपरेषा
११	संदर्भ सूची

"मानवी हक्क आणि मराठवाडयातील मातंग समाजाची परिस्थिती: एक चिकित्सक अभ्यास"

"जो पर्यंत प्रत्येक व्यक्तीस त्यांना त्यांच्या मानवी अधिकारांची कल्पना व महत्व प्राप्त होत नाही.तो पर्यंत त्यांचे मानवी अधिकार हे व्यर्थ समजले जातील." – इलनोर रुझवेल्ट, अध्यक्ष मानव अधिकारांचा जाहीरनामा मसुदा समिती

१. प्रस्तावना :(Introduction)

मानवांचा व मानवी हक्कांचा परस्परसंबंध अतूट आहे.जसे पंखविहीन पक्ष्यांना उंच झेप घेता येत नाही तसेच हक्कांशिवाय माणसांना आपला विकास साधता येत नाही.विशेषत: समाजातील दुर्बल घटकांना हक्क संरक्षणाची हमी आवश्यक असते.माणसाला हक्क जन्मत: नैसर्गिकदृष्ट्या प्राप्त झालेले असतात.परंतु विषय हक्क प्राप्तीचा नाही;तर विषय आहे,ते हक्क सर्वांना उपभोगता येतात का? जो पर्यंत कोणाकडून कोणाच्याही हक्कांवर मर्यादा आणल्या जात नव्हत्या तो पर्यंत त्याला हक्क म्हणजे काय ? आपले अधिकार कोणते? त्याच्या रक्षणाची जबाबदारी कोणावर असावी? यासारख्या प्रश्नापासून माणूस मुक्त होता.

मानवी हक्क म्हणजे काय ? या हक्कांचा विकास कसा झाला ? ह्या हक्काना वैधानिक ,नैतिक अधिष्ठान कोणी मिळवून दिले ? या उप -प्रश्नांच्या सहाय्याने आपणास उपरोक्त प्रश्नांचे उत्तरे मिळविता येतील.एक,मानवी हक्क म्हणजे काय ? हेराल्ड लास्की यांच्यामते,"मानवी अधिकार म्हणजे सामाजिक जीवनातील अशी परिस्थिति की ,ज्याशिवाय सामान्यत:कोणत्याही माणसाला आपला सर्वांगीण विकास साधता येऊ शकत नाही."दोन ,हक्कांचा विकास कसा झाला ? मानवी हक्कांचा इतिहास प्रदीर्घकालीन आहे.मुद्रित इतिहासात जे पुरावे सापडतात त्यामध्ये ,'सायरस वृत्तचित्ती 'हा मानवी अधिकारविषयक असलेला पहिला लिखित दस्तऐवज मानला जातो.याशिवाय 'उरूकगिना संहितेत' (इ.स.पूर्व २३५०) व 'उरनमुन्न संहितेत ' (इ.स.पूर्व २०५०) मानवी हक्कांचे लिखित पुरावे सापडतात.परंतु ,'Human Right'(मानव अधिकार) हा शब्दप्रयोग सर्वप्रथम हेनरी डेव्हिड थोरी यांनी आपल्या 'डीसओबीडियन्स' या ग्रंथात केला आहे.

तीन ,ह्या हक्काना वैधानिक ,नैतिक अधिष्ठान कोणी मिळवून दिले ?या अधिकारांनानैतिक व वैधानिक अधिष्ठान मिळवून देण्यात दोन प्रमुख घटकांनी महत्वाची भूमिका पार पाडली असे आढळते. .एक,जागतिक क्रांत्या व घडामोडी ,दोन,विचारवंतांचे बौद्धिक योगदान.प्रथम जागतिक घडामोडी मध्ये,मॅग्नाकार्टा (१२१५) ,पिटिशन ऑफ राइट (१६२८) इंग्लंडची गौरवशाली क्रांती (१६८८) बिल ऑफ राईट्स (१६८९) अमेरिकन राज्यक्रांती (१७७६) ,फ्रेंच क्रांती (१७८९), रशियन क्रांती (१९१७) व मानवी हक्कांचा वैश्विक जाहीरनामा (१९४८) या घटना घडामोडींनी मानवी हक्कांना वैधानिक अधिष्ठान मिळवून देण्यात महत्वाची भूमिका बजावली . दोन,विचारवंतांच्या सैद्धांतिक मांडणीत जॉन लॉक ,थॉमस हॉब्ज,जिन जॅक रुसो ,थॉमस पेन ,जे.एस.मील,टी.एच.ग्रीन,हेराल्ड लास्की यांचा नामोल्लेख करता येईल.यांनी आपल्या विचार व लेखनातून मानवी अधिकारांची सैद्धांतिक भूमिका विशद केली.

मानवी हक्कांची आवश्यकता व उपयुक्तता याविषयी वैश्विक व राष्ट्रीय स्तरावर चर्चा होत असली तरी जगासह भारतातील बहुतांश लोकांना आपले घटनात्मक ,वैधानिक व नैसर्गिक हक्क कोणते आहेत यांचीच जाणीव नाही ;काहींना जाणीव असली तरी हक्क उपभोगासाठी आवश्यक असलेली क्षमता नाही.परिणामी त्यांच्या मानवी हक्कांचे सहजपणे हनन होत असते.भारतीय राज्यघटनेने अधिकारवंचित जातीसमूहाला पारंपारिक गुलामींच्या जोखडातून मुक्त करून त्यांना माणूस म्हणून आपला विकास करण्यासाठी घटनात्मक हक्कांची तरतूद केली आहे.

परंतु वास्तव हे आहे की ,धर्मधिष्ठित जातव्यवस्थेच्या शोषणाचे बळी ठरलेल्या शूद्र व अतिशुद्र समूहातील बहुतांश जाती ,स्त्रिया या आजही हक्कवंचित आहेत.या हक्कवंचित-शोषित समुहापैकी ‘मातंग जातीसमुह ’ हा एक होय.त्यामुळे मातंग जातीसमूहातील बहुसंख्याकांची स्थिति पंखविहीन पक्षांसारखी झाली आहे.आजही मातंग समूह त्यांच्या प्राथमिक मानवी हक्कांपासून वंचित आहे.यास प्रामुख्याने जातव्यवस्था,उत्पादन साधन-संसाधनातील विषमता ,निरक्षरता,दारिद्रय,सामाजिक भेदभाव,अंधश्रद्धा,सार्वजनिक सेवेतील नगण्य प्रतिनिधित्वआणि रूढी-प्रथांचा प्रभाव हे कारणे जबाबदार आहेत.हे वरकरणी दिसत असले तरी ,यावर मानवी हक्कांच्या परिप्रेक्ष्यातून संशोधन होणे आवश्यक आहे.

२. समस्यासूत्रण:

२०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात मातंग जाती समूदायाची लोकसंख्या २ ,४८८,५३१ आहे;मराठवाडयात संख्या ९१५,८७३ आहे.मराठवाडयातील अनुसूचीत जाती प्रवर्गातील एकूण लोकसंख्येच्या हे प्रमाण ३०.७४ टक्के आहे.संख्यात्मक बाबतीत हा समूह दखलपात्र असला तरी ;हक्क उपभोगाच्या बाबतीत यांचा आलेख कमालीचा खालवलेला आहे.व्यवहारात अधिकार उपभोगता येत नसल्यामुळे त्यांच्या प्रगतीची गती मंद आहे.ही देशातील सर्वसमावेशक विकासा समोरील समस्या आहे.

भारतीय संविधांनातील उद्देशपत्रिकेच्या माध्यमातून आपण सामाजिक ,आर्थिक,राजकीय **न्याय,**विचार,अभिव्यक्ती,विश्वास,श्रद्धा,उपासना यांचे **स्वातंत्र्य**,दर्जा व संधीची **समानता** प्राप्त करून देऊन या सर्वांमध्ये **बंधुभाव** प्रवर्धित करण्याचा संकल्प केला आहे.परंतु वास्तव हे आहे की ,आजही जात,लिंग,धर्म,वर्ग तत्सम कारणावरून मानवी हक्कांचे उल्लंघन होत आहे.यामध्ये मातंग जाती समूहाचा यात अग्रक्रम लागतो.ही सामाजिक समस्या आहे.

भारतीय राज्यघटनेत मूलभूत हक्कांची तरतूद आहे.यामध्ये **समतेचा हक्क**,(कायद्यासामोरील समानता,भेदभावास मनाई ,सार्वजनिक सेवेतील समान संधी ,अस्पृश्यता निर्मूलन ,) **स्वातंत्र्याचा हक्क** (विचार स्वातंत्र्य ,अपराधाबद्दल दोषसिद्धीबाबत संरक्षण ,जीवनाचे व व्यक्तीगत स्वातंत्र्य संरक्षण,शिक्षणाचा हक्क ,अटक व स्थान बद्दतेपासून संरक्षण) **,शोषणा विरूद्धचा हक्क** (माणसांचा व्यापार आणि वेठबिगार यास मनाई ,बलमजुरीस प्रतिबंध) **,धर्मस्वातंत्र्याचा हक्क ,सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क ,आणि संवैधानिक उपाययोजनाचा हक्क** ह्या सहा मूलभूत हक्क आहे.या अधिकारांना न्यायलयीन संरक्षण असून सुद्धा मातंग व तत्सम उपेक्षित जातींना याचा लाभ होत नाही.

या समुहाच्या वाट्याला पिण्याचे पाणी ,मंदिर प्रवेश ,वराततील नाचणे ,जयंती मिरवणूक काढणे यासारख्या कारणावरून त्यांच्या अधिकारांचे हनन सहज होते.परंतु जीविताच्या नैसर्गिक हक्कावर गदा येते.समता,स्वातंत्र्य,न्याय,बंधुत्व,मानवी हक्क त्यांच्यासाठी घटनेतील शोभेच्या वस्तु ठरतात.परिणामी मानवी हक्कांपासून हा समूह वंचित राहत आहे. ही खरी समस्या आहे.

३. संकल्पना स्पष्टीकरण :

मानवी हक्कांची संकल्पना नैसर्गि क कायदा ह्या संकल्पनेचे अपत्य मानले जाते .माणसाला जन्म:तच काही हक्क निसर्गाकडून प्राप्त झालेले असतात .या गृहीतकृत्यांवर मानवीहक्कांची मांडणी करण्यात आलेली आहे .नैसर्गिक हक्क ,वैधानिक हक्क ,घटनात्मक हक्क ,मूलभूत हक्क तत्सम प्रकारे हक्कांचे वर्गीकरण केले जाते.

या संकल्पनेचा इतिहास प्राचीन आहे. ग्रीक,रोमन विचारवंता च्या लिखाणात आणि ख्रिस्ती तत्त्वज्ञानातमानवी हक्कांची मांडणी केल्याचे पुरावे सापडतात .१७ शतकात ह्यूगो ग्रोशिअस तर पुढील काळात मिल्टन आणि लॉक ह्या विचारवंतां नी मानवी अधिकारांच्या विकासात हातभार लावला . इंग्लंडमधील मॅग्ना कार्टा (१२१५) ,मध्ये पिटिशन ऑफ राइट्स (१६२८),बिल ऑफ राइट्स (१६८९)अमेरिकन स्वातंत्र्य(१७७६) ,फ्रेंच राज्यक्रांती व नागरिकांच्या हक्कांचा जाहीरनामा (१७८९) , अमेरिकेन स्वातंत्र्याचा जाहीरनामा (१७९१) ह्या सर्व घटनाक्रम मानवी हक्कांच्या विकास प्रक्रियेतील प्रमुख पैलू ठरले. हेराल्ड लास्की यांच्यामते,"मानवी अधिकार म्हणजे सामाजिक जीवनातील अशी परिस्थिति की , ज्याशिवाय सामान्यत : कोणत्याही माणसाला आपला सर्वांगीण विकास साधता येऊ शकत नाही."

४) संदर्भ साहित्याचा आढावा:

संशोधन प्रक्रियेत सदर्भ साहित्याच्या आढाव्याला विशेष महत्व आहे.या प्रक्रियेतून एक महत्वपूर्ण हेतु सफल होतो.तो म्हणजे ,संशोधकाने संशोधनासाठी ज्या विषयाची/समस्येची निवड केली आहे.त्या विषयाची प्रस्तुतता ,उपयोगिता आणि तिचे निराळेपण स्पष्ट होते.संशोधनाची पुनरावृत्ती टळते. संदर्भ साहित्यात संदर्भ ग्रंथ ,शोध प्रबंध ,नियतकालिके,शासनाचे अहवाल ,वृत्तपत्र,जनगणना अहवाल इत्यादींचा समावेश करता येतो.प्रस्तुत ठिकाणी मानवी हक्क व मातंग समाजाची परिस्थिती जे संदर्भ साहित्य उपलब्ध आहे.त्यांचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

I) मानवी हक्क व सामाजिक न्याय: कुलकर्णी पी.के. (२०१३)

मानवी हक्क व सामाजिक न्याय हे ग्रंथ प्रस्तुत संशोधनाच्या अनुषंगाने उपयुक्त आहे.मानवी हक्क संकल्पनाचा उदय ,विकास यासह मानवी अधिकार आणि सामाजिक न्याय यातील परस्पर सबंध यावर हे ग्रंथ भाष्य करते.या शिवाय भारतीय संविधान ,संयुक्त राष्ट्र संघ ,अधिकार संरक्षण यंत्रणा आणि दलित,महिला व बालके यांच्या अधिकारांवर यावर भाष्य केलेले आहे.त्यामुळे हा ग्रंथ मानवी हक्कांच्या अभ्यासकांसाठी उपयुक्त आणि दिशादर्शक आहे.

ii) मांग आणि त्यांचे मागते: मांडे प्रभाकर (दुसरी आवृत्ती, २००९)

डॉ.प्रभाकर मांडे यांच्या प्रस्तुतग्रंथाची पहिली आवृत्ती १९९९ मध्ये प्रकाशित झाली आहे.तर दुसर्या आवृत्तीचे २००९ ला प्रकाशन झाले.गोदावरी प्रकाशन ,औरंगाबादने हा ग्रंथ प्रकाशित केला आहे.या ग्रंथात एकूण अठरा प्रकरणे आहेत.यामध्ये मांग/मातंग जातीचा इतिहास ,संस्कृती,सामाजिक स्थान यांना प्रामुख्याने महत्व दिले आहे.औद्यगिक क्रांतीत्तोर काळात शहरीकरणमुळे उत्पादन साधन व्यवस्थेत आमुलाग्र बदल झाले.त्यामुळे या समुदायाच्या जीवनात झालेला आर्थिक बदल विषयी विवेचन करून त्यांच्यात होत असलेल्या परिवर्तनाचा ही पुस्तकात ऊहापोह केला आहे.

iii) भारताचे संविधान: (भारत सरकार विधी व न्याय मंत्रालय)(सातवी आवृत्ती २०१४)

प्रस्तुत संशोधनात भारतीय संविधानाला विशेष महत्व आहे.त्यामुळे संविधांनातील मानवी हक्कांच्या अनुषंगाने असलेल्या तरतुदींचा अभ्यास करण्यात आला आहे.यामध्ये प्रामुख्याने उद्देशपत्रिका,मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्वे यांचा समावेश आहे.सबंधित ग्रंथ भारत सरकारच्या विधी व न्याय मंत्रालय मार्फत १९७९ ला पहिली आवृत्ती प्रकाशित करण्यात आली आहे.तर सातवी आवृत्ती २०१४ प्रकाशित झाली आहे.महाराष्ट्र राज्याच्या भाषा संचालनालयाद्वारे द्विभाषा आवृत्ती अनुवादीत करण्यात आली आहे. शासन मुद्रण व लेखनसामग्र ,महाराष्ट्र राज्य यांच्याद्वारे मुद्रित व प्रकाशित करण्यात आले आहे.

iv) Rights of Man: (Thomas Paine) (1791)

मानवी हक्क विकास प्रक्रियेतील हा ग्रंथ मैलाचा दगड मानला जातो.महत्वाचे म्हणजे फ्रेंच राज्यक्रांती झाल्यानंतर एंडमंड बर्क यांनी Reflections on the Revolution in France (1790) हा ग्रंथ लिहिला होता.त्यांनतर थॉमस पेन यांनी राईट्स ऑफ मॅन हा ग्रंथ लिहिला.यामध्ये फ्रेंच क्रांतीनंतर जो मानवी हक्कांचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला तो बघायला मिळतो.या जाहीरनामाद्वारे माणूस हा जन्मत: स्वतंत्र आहे.माणसाला स्वातंत्र्याचा ,संपत्तीचा,सुरक्षेचा आणि अत्याचाराचा विरोध करण्याचा नैसर्गिक हक्क आहे हे जाहीर करण्यात आले.हा जाहीरनामा अनेक देशांमध्ये राज्यघटनेत मानवी हक्कांची तरतूद करण्यास प्रेरक ठरला आहे.

v) दलितांचा मानवी हक्कांसाठी संघर्ष: विशेष संदर्भ लातूर जिल्हा – अदमाने डी.आर. (२०१६)

प्रस्तुत संशोधकाने समाजशास्त्र विषयात उपरोक्त शीर्षकाचा स्वामी रामानंद तीर्थ ,नांदेड विद्यापीठात पीएच.डी.साठी प्रबंध सादर केला आहे.या प्रबंधात एकूण सहा प्रकरणे आहेत.यामध्ये त्यांनी प्रामुख्याने दलित समुदायातील घटक मानवी हक्कांपासून कसे वंचित आहेत.तो प्राप्तीसाठी कसा संघर्ष चालला आहे. यावर संशोधन केलेले आहे.

vi)**Universal Declaration of Human Rights: (UDHR) (1948)** **https://www.un.org/en/about-us/universal-declaration-of-human-rights**

आधुनिक विश्वातील मानवी हक्कांचा वैश्विक जाहीरनामा अत्यंत मोलाचा मानला जातो.संयुक्त राष्ट्र संघाच्या महासभेने १० डिसेंबर १९४८ ला मानवी हक्कांच्या वैश्विक जाहीरनाम्याला मंजूरी दिली.एका एक एतेहासिक दस्तऐवज आहे.या जाहीरनाम्यात एकूण ३० मूलभूत हक्कांचा उल्लेख आहे.याच्या अंमलबाजवणीची जबाबदारी राष्ट्र संघाच्या सभासद राष्ट्रावर आहे.हा जाहीरनामा जगातील जवळपास ५०० भाषांमध्ये भाषांतरीत झाला आहे.

५. उदीष्ट्ये: (Objectives)

1) मानवी हक्क संकल्पनेच्या उदय व विकासाचा अभ्यास करणे
2) भारतातील मानवी हक्क व घटनात्मक हक्कांच्या स्वरूपांचा अभ्यास करणे
3) मराठवाडयातीलमातंग जातसमूहाला मानवी हक्क उपभोगायला मिळतात का या अनुषंगाने सामाजिक,आर्थिक,शैक्षणिक व राजकीय स्थितिचे अध्ययन करणे.
4) मातंग समुदायालामानवी हक्क उपभोगण्यात येणार्याक अडथळयांचा अभ्यास करणे.

६. गृहीतके: (Hypothesis)

1) मराठवाडयातील मातंग जातसमूहाच्या मानवी अधिकारांचे हनन होत आहे.
2) मराठवाडयातील मातंग जात समूहाची सामाजिक,आर्थिक व राजकीयस्थिती मागास आहे.
3) मानवी हक्कांच्या संरक्षणाची अंमलबाजवणी होताना दिसत नाही.
4) संसाधनाच्या वितरणातीलविषमता ,जातव्यवस्था,निरक्षरता,अंधश्रद्धा यामूळे मातंग समूह हक्कांपासून वंचित आहे.

७. संशोधन पद्धती : (Research Methodology)

संशोधकाला संशोधन कार्य शास्त्रीय पद्धतीने करण्यासाठी सामाजिक संशोधन क्षेत्रात ज्या पद्धती विकसित करण्यात आल्या आहेत.त्यांच्या साह्याने आपले संशोधन कार्य पार पाडावे लागते.यामुळे वेळ,पैसा आणि श्रम यांची बचत होऊन अचूक निष्कर्ष काढणे सोपे जाते.प्रस्तुत संशोधन कार्यात वर्णनात्मक/सर्वेक्षणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.या संशोधन पद्धतीतून वर्तमान परिस्थितीचे आकलन करून अपेक्षित स्थितिचा वेध घेता येतो.प्रस्तुत संशोधन वर्तमानाशी निगडीत असल्याने संशोधकाने या पद्धतीचा वापर करण्याचे निश्चित केले आहे.

यासह प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात येईल.संशोधकास संशोधनासाठी संशोधन विषयाची निवड करून त्याचे महत्व अधोरेखीत करावे लागते.त्या अनुषंगाने संशोधनाचे उदीष्टे सांगून पूर्व ज्ञांनाच्या आधारावर गृहीतकृत्य निश्चित केले जातात.विषयानुरूप तथ्य संकलनासाठी नमूना निवड

करून प्रश्नावली ,मुलाखत,अनुसूची तत्सम प्राथमिक स्त्रोतांचा आधार घेतला जाईल.याशिवाय ग्रंथ,पुस्तके,मासिके,नियतकालिके,जनगणना अहवाल ,शासकीय–अशासकीय प्रकाशित-अप्रकाशित दस्तऐवज या दुय्यम साधनाच्या आधारे वस्तुनिष्ठ निष्कर्ष काढून उपाययोजना सुचविल्या जातील.

७) १)नमूना निवड:

गुड आणि हॅट यांच्या मते , "नमूना म्हणजे विस्तृत आकाराच्या समग्राचा लघु प्रतिनिधी होय." संशोधनाचे अध्ययन क्षेत्र निश्चित केल्यानंतर समग्रातून नमूना निवड करणे आवश्यक असते.ह्या प्रकारची नमूना निवड करताना संभाव्यता व गैरसंभाव्यता नमूना निवड पद्धतीचा विचार करावा लागतो.नमुन्याची निवड करून त्याची पाहणी करण्यामागे अभ्यासकाचा असा विश्वास असतो की ,नमुन्यातील पाहणीतून जे निष्कर्ष निघतील ते समग्राच्या निष्कर्षापेक्षा वेगळे नसतील.

नमूना निवडीचा आकृतीबंध

अ.क्रं.	नमूना जिल्हयांची नावे	नमूना तालुके (४०%)	तालुक्यातील एकूण गावांची संख्या	नमूना गावांची संख्या (५%)	उत्तरदाते संख्या (प्रत्येकी ५ प्रमाणे)
१)	**नांदेड (१६)**	धर्माबाद	५१	४	२०
		भोकर	८०	४	२०
		बिलोली	८३	४	२०
		नायगाव	८७	४	२०
		उमरी	६५	३	१५
		देगलूर	१०६	५	२५
२)	**लातूर (१०)**	उदगीर	९७	५	२५
		चाकूर	८३	४	२०
		अहमदपूर	१२३	६	३०
		शिरूर अनंतपाळ	४८	३	१५
३)	**हिंगोली (०५)**	वसमत	१४७	७	३५
		सेनगाव	४८	६	३०
एकूण	**०३ (३७.५%)**	**१२ (४०%)**	**१०९८**	**५५ (५%)**	**२७५**

प्रस्तुत संशोधनासाठी मराठवाडयातील आठ जिल्ह्यापैकी नांदेड ,लातूर व हिंगोली हे तीन जिल्हे (३७.५ टक्के) या तीन जिल्ह्यातील एकूण ३१ तालुक्यांपैकी अनुक्रमे सहा ,चार,दोन असे एकूण बारा तालुके (४० टक्के) सहेतुक नमुना पद्धतीने निवड करण्यात येईल.या बारा तालुक्यातील एकूण १०९८ गावांतील पाच टक्के गावांची म्हणजे एकूण ५५ गावांची निवड सुगम यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने निवड करण्यात येईल .नमुना म्हणून निवडलेल्या गावामधील प्रत्येकी पाच म्हणजे एकूण २७५ नमूना एकक म्हणून निवड करण्यात येईल.नमून्यांतर्गतशिक्षित-अशिक्षित ,तरुण-वृद्ध,स्त्री-पुरुष,नौकरीधारक व मजूर यांचा समतोल साधण्यात येईल

९. संशोधन विषय निवडीचे महत्व:

सामाजिकशास्त्रात संशोधनाला अनन्य साधारण महत्व आहे.त्यामुळे संशोधन विषयाची निवड करताना त्या विषयाची राष्ट्रीय ,अंतरराष्ट्रीय,प्रादेशिक महत्व काय आहे ?समाजउन्नतीसाठी पर्यायाने मानवीकल्याणला उपयुक्त आहेका ?याची काळजी घेण्याची जबाबदारी संशोधकावर असते.संशोधकाने प्रस्तुत विषयाची निवड करतांना ह्या सर्व पैलूंचा विचार केलेला आहे.

१) अंतरराष्ट्रीय उपयुक्तता:

अंतरराष्ट्रीय स्तरावर मानवी हक्कांचे संरक्षण हा कळीचा मुद्दा बनला आहे. भारत जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र आहे.तसेच संयुक्त राष्ट्र संघाच्या निर्मितीचा संस्थापक सदस्य आहे.संयुक्त राष्ट्र संघाने आपल्या सदस्य राष्ट्रांच्या शिरावर मानवी हक्क संरक्षण करण्याची जबाबदारी सोपविली आहे.त्या अनुषंगाने भारतातील सर्व घटकांचे मानवी हक्क संरक्षण होतात की नाही याचे अध्ययन होणे अंतरराष्ट्रीयदृष्ट्या उपयुक्त आहे.

२) राष्ट्रीय उपयुक्तता:

राष्ट्राचा विकास म्हणजे विशिष्ट समुहाचा विकास नसून ह्या विकासाची व्याप्ती सर्वसमावेशक असायला हवी.देशातील शोषित ,पिडीत,अन्यायग्रस्त व हक्कवंचित समूहाला विकासप्रवाहात सामिल करून त्यांच्या जीवनमान ,राहणीमानाचा दर्जा उंचावयाला हवा ;मानवी हक्क सुरक्षितपणे व निर्भयपणे

उपभोगण्याची त्यांची क्षमता विकसित व्हायला हवी.देशातील विविध राज्यात (जवळपास १४ राज्यात) मातंग समुदाय निवास करून आहे.महाराष्ट्रात ह्या समूहाची लोकसंख्या लक्षणीय आहे.त्यांना त्यांचे मानवी हक्क उपभोगता आल्यास राष्ट्राच्या सर्वसमावेशक विकासाला हातभार लागेल.

३) प्रादेशिक महत्व:

महाराष्ट्राची ओळख पुरोगामी राज्य म्हणून देशाला आहे .मात्र या पुरोगामी राज्यातील जनता संविधानाच्या अमंलबाजवणीला सत्तर वर्ष झाले तरीही घटनात्मक हक्क व मानवी हक्क उपभोगू शकत नाही.मात्र यापाठीमागची कारणे काय ? याचा शास्त्रीय पद्धतीने अध्ययन करून यावर उपाययोजना सुचविल्यास शासनाला ,धोरणकर्त्यांना या समूहाला राष्ट्रविकासाच्या मुख्यप्रवाहात सामील करून घेण्यासाठी विकास आराखडा निश्चित करता येईल.त्या अनुषंगाने ह्या विषयाचे महत्व आहे.

१०. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:

संशोधन कार्यात अचूकता येण्यासाठी संशोधकाला आपल्या कार्यकक्षा व मर्यादा निश्चित करावे लागतात.प्रस्तुत संशोधकानेही आपल्या संशोधनाची व्याप्ती व मर्यादा अधोरेखित केल्या आहेत.मातंग जातसमुदाय देशातील जवळपास चौदा घटक राज्यात वास्तव्यास आहे.कमी-अधिक प्रमाणात यांची सर्वत्र स्थिति मानवी अधिकारांपासून वंचित असल्यासारखी आहे.परंतु या सर्वांचे अध्ययन एकाच संशोधन प्रबंधात मांडणे शक्य नाही ;तशी आवश्यकता ही नाही.प्रस्तुत संशोधकाने मराठवाडयातील विशेषत: नांदेड.लातूर व हिंगोली जिल्ह्यातील मातंग समुदायाची परिस्थितीचा मानवी हक्काच्या परिप्रेक्ष्यातून अभ्यास करण्याचे निश्चित केले आहे.तसेच आपल्या संशोधनकार्यास कालमर्यादा ही घालून घेतली आहे. १९९० ते २०२० पर्यंतचा काळ निश्चित करण्यात आला आहे.

११. प्रकरणाची रूपरेषा:

प्रकरण पहिले:

विषय प्रवेश व संशोधन आराखडा

१.१	प्रस्तावना/ विषय प्रवेश
I)	जातसंस्था: व्याख्या,उत्पत्ती व लक्षणे
ii)	मातंग/मांग : शब्दाची व्युत्पत्ती व अर्थ
iii)	मातंग समाजाची एतेहासिक पार्श्वभूमी
iv)	मातंग जाती व पोट-जाती
१.२	संशोधन आराखडा
१.२.I)	संशोधन विषय निवडीचे महत्व
१.२.ii)	समस्यासुत्रण
१.२.iii)	संकल्पना स्पष्टीकरण
१.२.iv)	गृहीतके
१.२.v)	संशोधनाची उदीष्टे
१.२.vi)	संशोधन पद्धती
१.२.vii)	नमूना निवड पद्धती
१.२.viii)	तथ्य संकलनाची साधने
१.२.ix)	संशोधनाची व्याप्ती व मर्यादा
१.३	समारोप

प्रकरण दुसरे:

मानव अधिकारांचा उदय व विकास

२.१	प्रस्तावना
२.२	संबधित संकल्पना
२.३.	मानवी अधिकाराचा अर्थ
I)	व्याख्या
२.४.	मानवी अधिकाराचा: उदय व विकास
.अ)	सायरस वृत्तचित्ती (इ.स.पूर्व ५३९)
ब)	मॅग्नाकार्टा (इ.स.१२१५)
क)	पिटिशन ऑफ राईटस/ हक्कांचे विनंतीपत्र (इ.स.१६२८)
ड)	इंग्लंड ची गौरवशाली राज्यक्रांती (इ.स.१६८८)
इ)	अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा (इ.स.१७७६)
उ)	फ्रेंच राज्यक्रांती (इ.स.१७८९)
ऊ)	मानव अधिकार विषयक सिद्धांत
ए)	रशियन क्रांती: (इ.स.१९१७)
ऐ)	मानव अधिकारांचा वैश्विक जाहीरनामा : (इ.स.१९४८)
२.५.	समारोप:

प्रकरण तिसरे

भारतातील मानवी अधिकारांचे : स्वरूप

३.१	प्रस्तावना
३.२	मानवी हक्क विषयक धार्मिक दृष्टीकोण
३.३	भारतातील प्रबोधन चळवळीतील प्रमुख सुधारक
३.४.	ब्रिटिश राज्यव्यवस्थेचा प्रभाव
३.५	भारतीय संविधान व मानवी हक्क
I)	उद्देशपत्रिका
ii)	राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे
iii)	मूलभूत हक्क
३.६.	मानवी हक्क संरक्षण यंत्रणा
I)	राष्ट्रीय मानव अधिकार आयोग(National Human Rights Commission)
ii)	राज्य मानव अधिकार आयोग
iii)	अन्य आयोग
३.७.	मानव अधिकार संरक्षण अधिनियम (१९९३)
३.८	समारोप

प्रकरण चौथे

मानव हक्कांच्या परिप्रेक्ष्यातून मराठवाडयातील मातंग समाजाच्या परस्थितीचे अध्ययन

४.१.	प्रस्तावना
४.२	लोकसंख्या
४.३	समतेचा हक्क व सामाजिक स्थिति (Social status)
४.४	स्वातंत्र्याचा हक्क व अन्याय - अत्याचार
४.५	शोषणाविरूद्धचा हक्क व आर्थिक स्थिति (Economic Status)
४.७	शैक्षणिक हक्क व शैक्षणिक स्थिति
४.८	निवारा विषयक स्थिति
४.९	राजकीय स्थिति
४.१०	आरोग्य विषयक स्थिति
४.११	प्रमुख नेत्यांच्या मुलाखती
४.१२	समारोप

प्रकरण पाचवे

निष्कर्ष व उपाययोजना

५.१	प्रस्तावना
५.२	प्रकरणांची मांडणी
५.३	गृहीतकृत्यांची पडताळणी
५.४	निष्कर्ष
५.५	उपाययोजना
५.६	पुढील दिशा

१२. संदर्भ सूची

१. 'मानव अधिकार और हम' - जैन उर्मिला,परमेश्वरी पब्लिकेशन,दिल्ली, (२०१२)

२. 'मानवी हक्क ' (मानव अधिकार राष्ट्रीय कार्यशाळा) राज्यशास्त्र विभाग,महात्मा बसवेश्वर महाविद्यालय,लातूर - (वाघमारे जनार्दन, कुंभार नागोराव,लेख (संपा.), कुलकर्णी सुधाकर, २०१०)

३. 'मानव अधिकार आणि कर्तव्य यांचा परिचय ' - डॉ.शास्त्री टी.एस.एन.,भा.व्य.गिरी (अनु.),मुद्रण विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे.प्रथम आवृत्ती, (२०१८)

४.'मानव अधिकार आणि मूल्य शिक्षण ',(शोध निबंध संग्रह)- निकुंभ,आठवले (संपा.),प्रशांत पब्लिकेशन,जळगाव. (२०१४)

५. सामाजिक संशोधन पद्धती,भांडारकर पु.ल.,महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ,नागपुर (१९८७)

६.'Human Rights in Constitutional Law, D.D.Basu,Prentice Hall Delhi,(1994)

७. 'मॅग्नाकार्टा',गायकवाड सुनील, समाज प्रोबोधन पत्रिका,जुलै – सप्टेंबर, (२०१५)

८. 'फ्रेंच राज्यक्रांती', दिघे वि.गो.,आशय प्रकाशन, नागपूर प्रथम आवृत्ती,(१९८१)

९.'राजकीय सिद्धांत आणि विश्लेषण' भोळे भा.ल.,पिंपळापुरे बुक डीस्ट्रीब्यूटर्स,नागपूर, (२००२)

१०. सामाजिक संशोधन पद्धती,डॉ.बी.एम.कुर्हाडे ,पिंपळापुरे बुक डीस्ट्रीब्यूटर्स,नागपूर

संशोधक
पिराजी दत्ता गोणारकर
राज्यशास्त्र विभाग
कला व वाणिज्य महाविद्यालय,सोयगाव
ता.मालेगाव जी.नाशिक

मार्गदर्शक
प्रा.डॉ.कविता गंगाधर सोनकांबळे
राज्यशास्त्र विभाग
यशवंत महाविद्यालय नांदेड